# पेटंटमध्ये शिवाजी विद्यापीठ राज्यात अव्वल


**Anuradha.kadam**
@timesgroup.com
Tweet : anuradhakadamMT


**कोल्हापूर :** तब्बल ४९ स्वामित्व हक्कांसह (पेटंट) शिवाजी विद्यापीठ राज्यात अव्वलस्थानावर आहे. राज्यातील ११ अकृषी विद्यापीठांकडे असलेल्या १५५ पेटंटपैकी ४९ पेटंट शिवाजी विद्यापीठातील संशोधक, प्राध्यापकांच्या नावाने असल्याचे दिसून आले आहे. केंद्र सरकारच्या शिष्यवृत्ती व संशोधन प्रोत्साहन योजनेंतर्गत मांडण्यात आलेल्या लेखाजोख्यातून ही संशोधन भरारी स्पष्ट झाली आहे. मुंबई आणि पुणे ही दोन्ही विद्यापीठे या क्रमवारीत प्रत्येकी ३२ पेटंटसह दुसऱ्या स्थानावर आहेत. पेटंटमध्ये विद्यापीठाने घेतलेल्या आघाडीमुळे संशोधनक्षेत्रात विद्यापीठाच्या योगदानावर शिक्कामोर्तब झाले आहे.

देशपातळीवर संशोधनात अधिकाधिक स्वामित्व हक्क भारतीय विद्यार्थी व प्राध्यापकांच्या नावावर कोरले जावेत या उद्देशाने केंद्र सरकारच्या मनुष्यबळ मंत्रालयाच्या पुढाकाराने गेल्या दहा वर्षांपासून शिष्यवृत्ती व संशोधन प्रोत्साहन योजना सुरू केल्या आहेत. या योजनांची अंमलबजावणीही शिवाजी विद्यापीठाने सक्रियपणे केली आहे. गेल्या काही वर्षांपासून संशोधनाकडे अधिकाधिक विद्यार्थी वळावेत तसेच अध्यापनक्षेत्रात कार्यरत असताना पेटंट घेण्यामध्ये प्राध्यापकांनी योगदान द्यावे यासाठी विद्यापीठाकडून विशेष प्रयत्न सुरू आहेत.

विद्यापीठातील प्राध्यापकांच्या नावे असलेल्या 'स्वामित्व हक्कां'च्या विषयांमध्ये मटेरियल सायन्स विभागातील संशोधित उत्पादनांचा प्रामुख्याने समावेश आहे. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, जैवतंत्रज्ञान या विषयांमध्ये सर्वाधिक पेटंट विद्यापीठाने मिळवले आहेत. गॅस सेन्सर, सोलर सिस्टीम, सुपर कपॅसिटी, स्पेक्ट्रो रिस्पॉन्स या विषयातील पेटंट उत्पादननिर्मितीसाठी तयार आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर जेव्हा नव्या तंत्रज्ञानाची निर्मिती होत असते, तेव्हा पेटंटद्वारे संशोधित केलेले सूत्र वापरण्याचे हक्क संबंधित पेटंट करणाऱ्या संशोधकांकडे असतात. सध्या विद्यापीठाने संशोधित केलेले व पेटंट मिळवलेल्या ४९ विषयांवर आधारीत नवतंत्रज्ञानपर उत्पादनांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पण, भारतीयांना परवडतील अशा वस्तू बनवण्यात या पेटंटचे मोठे योगदान आहे.

## आयपीआर सेलद्वारे विविध उपक्रम

पेटंटमधील सूत्राच्या आधारे तयार होणारे उत्पादन सर्वसामान्य माणसांच्या वापरात यावे तसेच किंमत, दर्जा आणि उपयुक्तता यांचा मेळ साधला जावा यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या बौद्धीक स्वामित्व हक्क (आयपीआर) या सेलद्वारे विविध उपक्रम राबवले जात आहेत. यामध्ये पेटंटसाठी संशोधन प्रकल्प लेखनाबाबत कार्यशाळांचे आयोजन करण्यात येते. सध्या २०० पेक्षा अधिक प्राध्यापक संशोधन व पेटंटच्या अभ्यासासाठी परदेशी विद्यापीठांमध्ये काम करत आहेत. दरवर्षी विद्यापीठातील १५ ते २० प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी पेटंटसाठी प्रस्ताव दाखल करतात. ज्या विषयातील संशोधनाचे स्वामित्व हक्क मिळवायचे आहेत त्याबाबतचा प्रस्ताव कसा तयार करायचा, त्यासाठी भाषा कशी वापरायची, लेखन कसे करायचे याबाबत सातत्याने मार्गदर्शन करण्यासाठी हा आयपीआर सेल कार्यरत आहे.



## विद्यापीठ करणार 'पेटंट'साठीचा खर्च

संशोधक विद्यार्थ्यांनी जो विषय निवडला आहे, त्या विषयाची व्याप्ती, संशोधन पद्धतीचा अवलंब यावर पेटंटचा आर्थिक खर्च अवलंबून असतो. मात्र अधिकाधिक संशोधक विद्यार्थ्यांनी पेटंट घेण्याकडे स्वारस्य दाखवावे, म्हणून पेटंट प्रक्रियेसाठी येणारा सर्व खर्च शिवाजी विद्यापीठच करणार आहे. प्रोत्साहन व शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यापीठाने हा निर्णय घेतला आहे. पेटंटसाठी प्रस्ताव सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठातर्फे १०० टक्के अनुदान देण्यात येणार असल्याचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले.

## संशोधनात भरारी; पेटंट प्रक्रियेचा खर्च विद्यापीठच करणार

## पेटंटचे विषय

- गॅस सेन्सर
- सोलर सिस्टिम
- कॉपर झिंक टिन
- कॉपर झिंक सल्फाइड
- मँगेनीज ऑक्साइड
- टंगस्टन ऑक्साइड
- टंगस्टन सल्फाइड
- स्प्रे स्पायरोलेसीस
- नॅनो मटेरियल सिंथेसर
- कार्बनडॉक्स
- व्हरायटी ऑफ मेटल
- मेटल डिटेक्टर
- ॲक्टीव्हेटेड कार्बन टू ॲडसॉर्बंट
- मायक्रोव्हीयल प्रॉडक्शन एल डोपा

"पंचवार्षिक बृहत आराखड्यामध्ये पेटंटमध्ये शिवाजी विद्यापीठाची क्रमवारी चढती रहावी यासाठी नियोजन केले आहे. मटेरियल सायन्समध्ये पेटंटची संख्या वाढावी, जेणेकरून आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्पादित होणाऱ्या उपकरणांच्या स्वामित्व हक्कात विद्यापीठाचे योगदान वाढेल. याद्वारे आयपीआर सेलद्वारे पॉलिसी फ्रेम तयार करण्यात आली आहे. पुढील पाच वर्षांत पेटंटबाबत प्रोत्साहनाची व्याप्ती महाविद्यालयांपर्यंत पोहोचवण्यात येणार आहे.

– **डॉ. डी. टी. शिर्के**, प्र कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

4 OCT 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षणच्या ८ विषयांना 'युजीसी'ची मान्यता

## युजीसीच्या परीक्षेत विद्यापीठ पास : विद्यापीठाच्या संकेतस्थळावर युजीसीचे पत्र : विद्यार्थ्यांना दिलासा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

देशातील १४३ तर राज्यातील सर्वच विद्यापीठ व संस्थांमधील दूरशिक्षण केंद्रांची प्रवेश प्रक्रिया विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) थांबवली होती. युजीसीने दिलेल्या सूचनांनुसार केलेल्या अहवालाचे सादरीकरण व सर्वच विद्यापीठांच्या इंटरफेस बैठका दिल्ली येथील युजीसीच्या कार्यालयात पार पडल्या. बुधवारी युजीसीने १२ पैकी ८ विषयांना मान्यता दिल्याचे पत्र शिवाजी विद्यापीठाला दिले आहे. हे पत्र विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. त्यामुळे दूरशिक्षणाच्या हजारो विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला असून येत्या दोन दिवसांत प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे. अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

**विद्यापीठाच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध**

युजीसीने दूरशिक्षण केंद्राच्या नियमात बदल करीत २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून नवीन नियम तयार केले आहेत. या नियमानुसार स्टडी मटेरियल वितरण व्यवस्था, प्राथमिक सोयी-सुविधा, दूरशिक्षणसाठी लागणारे मनुष्यबळ, यासह अन्य बाबींची पुर्तता करण्याच्या सूचना युजीसीने देशभरातील सर्वच विद्यापीठांना दिल्या आहेत. या सूचनांनुसार विद्यापीठाने सादरीकरण केल्यानंतर युजीसीने १२ पैकी ८ विषयांना मान्यता दिले. यामध्ये एम.बी.ए., बी.कॉम., एम. कॉम., एमबीए एम.ए.अशा अंतर्गत ८ विषयांचा समावेश आहे. येत्या दोन दिवसात प्रवेश प्रक्रिया सुरू होईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहनही विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.



4 OCT 2018

पुण्यनगरी


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरुणाईमध्ये भारत घडविण्याची क्षमता

## - किशोर बेडकिहाळ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

आजच्या तरुणांमध्ये उद्याचा भारत घडवण्याची क्षमता आहे; परंतु विवेक आणि श्रद्धा यांच्या सहअस्तित्वाशिवाय ते शक्य नाही. तरी तरुणवर्गाने व्यक्तिशः कोणत्याही जातीच्या आणि धर्मांध संघटनांमध्ये जाऊ नये, आपला विवेक शाबूत ठेवावा आणि कुणीही कोणत्याही कारणास्तव चिथवले तरीही हिंसेचा मार्ग स्वीकारू नये, असे आवाहन ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता आणि समावेशक धोरण अभ्यासकेंद्रातर्फे आयोजित प्रभाकरपंत कोरगावकर व्याख्यानमालेमध्ये 'आधुनिक महाराष्ट्राची वैचारिक जडणघडण' या विषयावरील व्याख्यानमालेत शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित प्रभाकरपंत कोरगावकर व्याख्यानमालेमध्ये बोलताना किशोर बेडकिहाळ.** (छाया : एस. अली)

सभागृहामध्ये बोलत होते.

किशोर बेडकिहाळ म्हणाले, वासाहतिक सत्तेच्या आगमनानंतर महाराष्ट्रातील सामाजिक, वैचारिक, सांस्कृतिक चर्चाविश्वात झालेल्या बदलांची मांडणी करत बेडकिहाळ यांनी या चर्चाविश्वात भाग घेणाऱ्यांची ढोबळमानाने सुधारवादी आणि परंपरावादी अशा दोन गटात विभागणी केली आणि आधुनिक महाराष्ट्राच्या वैचारिक जडणघडणीत महात्मा फुले, महात्मा गांधी, आचार्य भागवत, जावडेकर, आगरकर, रानडे, टिळक यांच्यापासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यशवंतराव चव्हाण आणि कॉ. शरद पाटील यांच्यापर्यंत अनेकांचा वैचारिक प्रभाव कसा पडला यांचे विवेचन केले.

व्याख्यानमालेचा समारोप करताना शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र विभागाच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांनी श्रद्धा आणि विवेक यांच्या सहअस्तित्वाचा पुरातन वारसा टिकवण्याची गरज असल्याचे सांगितले. व्याख्यानासाठी कोरगावकर ट्रस्टच्या विश्वस्त पल्लवीताई कोरगावकर उपस्थित होत्या. प्रास्ताविक व स्वागत सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. नंदा पारेकर यांनी केले, तर आभारप्रदर्शन केंद्राचे सहा. प्रा. अविनाश भाले यांनी केले. व्याख्यानासाठी प्रा. अशोक चौसाळकर, दिनकर झिम्बरे, दशरथ पारेकर, अनमोल कोठडिया, कोरगावकर ट्रस्टचे प्रतिनिधी आणि विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. निलीशा देसाई यांनी सूत्रसंचालन केले. तसेच कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी केंद्रातील संशोधक सहाय्यक डॉ. किशोर खिलारे, व्यावसाहिक सहायक शरद पाटील आणि डाटा ऑपरेटर श्रीधर साळोखे यांनी प्रयत्न केले.

पुढारी



कोल्हापूर : प्रभाकरपंत कोरगावकर व्याख्यानमालेत बोलताना ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ. सोबत इतर मान्यवर.

# तरुणांनी विवेक शाबूत ठेवावा : बेडकिहाळ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आजच्या तरुणांमध्येच उद्याचा भारत घडवण्याची क्षमता आहे. परंतु, विवेक आणि श्रद्धा यांच्या सहअस्तित्वाशिवाय ते शक्य नाही. तरी तरुणवर्गाने व्यक्तिश: कोणत्याही जातींच्या आणि धर्मांध संघटनांमध्ये जाऊ नये, आपला विवेक शाबूत ठेवावा आणि कुणीही कोणत्याही कारणास्तव चिथवले तरीही हिंसेचा मार्ग स्वीकारू नये, असे आवाहन सातारा येथील ज्येष्ठ विचारवंत किशोर बेडकिहाळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता आणि समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या वतीने आयोजित प्रभाकरपंत कोरगावकर व्याख्यानमालेत 'आधुनिक महाराष्ट्राची वैचारिक जडणघडण' या विषयावर ते बोलत होते.

विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र विभागाच्या अधिष्ठाता डॉ. प्रा. भारती पाटील यांनी श्रद्धा आणि विवेक यांच्या सहअस्तित्वाचा पुरातन वारसा टिकवण्याची गरज असल्याचे सांगितले.

प्रास्ताविक अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. नंदा पारेकर यांनी केले. केंद्राचे सहा. प्रा. अविनाश भाले यांनी आभार मांडले. यावेळी कोरगावकर ट्रस्टच्या विश्वस्थ पल्लवी कोरगावकर, प्रा. अशोक चौसाळकर, दिनकर झिम्बरे, दशरथ पारेकर, अनमोल कोटडिया, संशोधक सहायक डॉ. किशोर खिलारे, व्यावसायिक सहायक शरद पाटील, श्रीधर साळोखे आदींसह विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.